# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/08/2023 (गुरूवार) सकाळ


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक १०/०८/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे मौदा हद्दीतून १० चक्का ट्रक क्र. MH-४०—CD २२०२ या वाहनाने बेकायदेशीरपणे गोवंश यांना त्यांची चारा पाण्याची सोय न करता गाडीमध्ये कोंबून कत्तलीकरीता भंडारा येथून नागपूर कडे जात आहे. यावर स्टाफचे मदतीने मौजा माथनी टोलवर नाकाबंदी करून त्याला थांबविण्याचा ट्रक चालकास इशारा दिला असता न थांबता पळून गेला यावर सदर गाडीचा सरकारी वाहनाने पाठलाग केला असता सदर वाहन हे फरार आरोपी १० चक्का ट्रक क्र. MH—४०/ CD २२०२ चा चालक व मालक नामे— फिरोज फारुख कुरेशी रा. कामठी गुमथाळा हे ब्रीज खाली वाहन उभे करून घटनास्थळाहुन पळून गेले. सदर वाहनाची पाहणी केली असता त्यात १७ गोवंश जनावरे किंमती अंदाजे ०१ लाख ७० हजार रु. चे जनावरे क्रुर व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण १७ गोवंश जनावरे किंमती अंदाजे ०१ लाख ७० हजार रूपयाचे व १० चक्का ट्रक वाहन क्र. MH— ४०/CD- २२०२ किंमती अंदाजे १५ लाख रूपये असा एकुण किंमती अंदाजे १६ लाख ७० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्ती मुद्देमाल व फरार चालक व मालक यांचे विरुद्ध कलम ११(१) ड प्राणी सरंक्षण कायदा ५ (१) ब, ९ प्राण्यास निर्दयतेने वागणूक अधिनियम, कलम १०९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक संजय बरोदीया, प्रमोद भोयर चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.




## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा महालगाव शिवार येथे दिनांक ०८/०८/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ०९/०८/२०२३ चे ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अभिजीत क्रिष्णाजी वानखेडे, वय २८ वर्ष रा. महालगाव ता. कामठी यांनी दिनांक ०८/०८/२०२३ रोजी सायंकाळी ०७/०० वा. श्री. दत्तक कृशी सेवा केन्द्र दुकानाला लॉक लावून आपल्या घरी निघून गेले व दुसऱ्या दिवशी दिनांक ०९/०८/२०२३ ला सकाळी ०५/०० वा. हे श्री. दत्तक कृषी सेवा केंद्र दुकान जवळून जात असतांना दुकानाकडे बघितले असता दुकानाचा लोखंडी शटर अर्धा उघडा दिसला तेव्हा दुकानामधील सीसीटीव्ही कॅमेरे चालू स्थितीत दिसले मोबाईलला सिसिटीव्ही कॅमेरे ऑनलाईन केले असल्याने मोबाईल बघितले असता दिनांक ०९/०८/२०२३ चे ०३/५८ वा. दुकानामधील काउंटर मधील ड्रावर उघडून त्यामधील अंदाजे नगदी १५००/—रू. चोरी केले आहे. तसेच श्री. दत्तक कृषी सेवा केंद्र दुकानाच्या दोन दुकान आड राजेश महादेव धुडस यांच्या राज रेस्टोरेंट दुकानातील कॉउंटर मधून २२००/— रूपये असे एकुण ३७००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अरविंद मोहोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर